**1S3** **CC1**

**D.El.Ed. Examination**

**JUNE, 2019**

**Second Year (2016 Revised Syllabus)**

# NEW TRENDS IN EDUCATION

**(Marathi Medium)**

**Time : 3.00 to 5.00 Hrs.**

**Date : 10/6/2019** **(4 Pages)** **Max. Marks : 40**

1. (अ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहून विधाने पुन्हा लिहा : 4

(1) कृतिसंशोधनाची संकल्पना शिक्षण क्षेत्रासाठी प्रथम .................... यांनी वापरली. 1

(2) कृतिसंशोधनासाठी प्रामुख्याने .................... पद्धतीचा वापर केला जातो. 1

(3) 1997 मध्ये .................... ने दहा मूलभूत जीवनकौशल्ये निश्चित केलेली आहेत.

(4) शिक्षण हक्क कायद्यांतर्गत राज्याने केलेल्या नियमात .................... दिवस सतत गैरहजर मुलांना सुद्धा शाळाबाह्य मानले जाते.



P.T.O.

(ब) जोड्या जुळवा : 4

| 'अ' गट | 'ब' गट | |
|---|---|---|
| (1) मिड-डे मिल योजना | (अ) ज्ञानदान हे पवित्र कार्य | 1 |
| (2) शाळा सिद्धी | (ब) 1 जून, 2015 | 1 |
| (3) शैक्षणिक पर्यटन | (क) 15 ऑगस्ट, 1995 | 1 |
| (4) शिक्षक | (ड) केळकर संग्रहालय | 1 |
| | (ई) शाळा मुल्यांकनासाठी संस्था यंत्रणा | |

2. **खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी *60* ते *80* शब्दांत लिहा :** 8

(1) तंत्रस्नेही शिक्षकाची कोणतीही **चार** गुणवैशिष्ट्ये सांगा. 2

(2) शिक्षकांची आचारसंहिता म्हणजे काय ? 2

**किंवा**

शिक्षणातील नीतितत्त्वे म्हणजे काय ?

(3) आंतरराष्ट्रीय शांतता शिक्षणासाठी कार्य करणाऱ्या रूटजेरस युनिव्हर्सिटी, न्यूयॉर्कचे कार्य स्पष्ट करा. 2

**किंवा**

शांतता शिक्षणासाठी तुम्ही शाळेत राबविलेले **चार** उपक्रम लिहा.

(4) तुम्ही तुमची व्यावसायनिष्ठा कशी वाढवाल ? 2

**किंवा**

तुम्ही शिक्षक या नात्याने विद्यार्थ्यांशी वर्तन करतांना कोणकोणत्या गोष्टी कटाक्षाने टाळाल ?

3. **खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी *120* ते *160* शब्दांत लिहा :** **12**

(1) तुमच्या शालेय आंतरवासिता शाळेमध्ये सर्वशिक्षा अभियानांतर्गत राबविण्यात येत असलेले कोणतेही **तीन** उपक्रम स्पष्ट करा. 3

(2) कृतिसंशोधनाची संकल्पना, गरज व महत्त्व थोडक्यात स्पष्ट करा. 3

**किंवा**

नवोपक्रमाची संकल्पना स्पष्ट करून नवोपक्रम निश्चितीचे निकष लिहा.

(3) टेलिकॉन्फरंसींगच्या विविध प्रकारांचा तुम्ही शिक्षणामध्ये कसा वापर करून घ्याल ? 3

(4) शाळा विकासासाठी तुमच्या परिसरातील NGO चा कसा उपयोग करून घ्याल ते लिहा. 3

**किंवा**

विद्यार्थी सुरक्षिततेला धोका निर्माण करणारे कोणत्याही **तीन** घटकावर तुम्ही कशाप्रकारे उपाययोजना कराल ? 3

4. **खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी *200* ते *250* शब्दांत लिहा :** **12**

(1) तुम्ही केलेल्या कृतिसंशोधनासाठी निवडलेल्या माहिती संकलनाच्या साधनांचे फायदे/गुण लिहून त्या साधनांचा वापर कोणत्या प्रकारे केला ते लिहा. 4

(2) परिणामकारक अध्ययन घडून येण्यासाठी ज्ञानरचनावादी वर्गाची रचना तुम्ही कशी कराल ? ते लिहा. 4

**किंवा**

भावनांचे समायोजन व सर्जनशील विचार ही जीवनकौशल्ये तुम्ही शालेय विद्यार्थ्यांमध्ये कसे रुजवाल ?

(3) कार्यक्रम व्यवस्थापन म्हणजे काय ? ते सांगून शालेय आंतरवासिता दरम्यान राबविलेल्या कोणत्याही **एका** कार्यक्रमाचे व्यवस्थापन तुम्ही कसे केले ते मुद्देसूद लिहा. 4

**किंवा**

शिक्षक-पालक समन्वय आणि अप्रगत विद्यार्थी-विहीन वर्ग यासाठी प्रत्येकी **दोन** उपक्रम सुचवा.